देयकांचे अदायगीकामी लेखा
विभागाकडे बिले सादर करतांना
करावयाच्या कार्यवाहीबाबत...

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८**
**लेखा विभाग**
**जावक क्र.लेखा/ १अ /कावि/ १९६ /२०१९**
**दिनांक – २१ फेब्रुवारी २०१९**

**परिपत्रक,**

लेखा विभागामार्फत विविध विभागांकडून सादर करण्यात येणा-या बिलांचे अदायगीचे कामकाज करण्यात येते. त्याकरिता बिलासमवेत विहित नमुन्यातील पडताळणीसूची (Check list) संबंधित विभागप्रमुखांमार्फत प्रमाणित करुन सादर करण्यात येते.

तथापि, सदर पडताळणी सूची मध्ये असलेल्या बाबींची पूर्णपणे पूर्तता करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच पडताळणी सूचीमध्ये नमूद केलेला "पृष्ठ क्रमांक" व धारिकेमधील "पृष्ठ क्रमांक" वेगवेगळे असल्याचे आढळून आले आहे.

तरी प्रस्तुतचे परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते की, त्यांचेमार्फत लेखा विभागाकडे अदायगीकामी सादर करण्यात येणारी सर्व बिले ही पडताळणी सूचीमध्ये नमूद केलेल्या बाबींची तंतोतंत पूर्तता करुन तसेच त्यामध्ये नमूद असलेले पानांक क्रमवार नस्तीबध्द करुन मगच ते लेखा विभागाकडे पाठविण्यात यावे.

यापुढे वरीलप्रमाणे पूर्तता करण्यात न आलेल्या बिलांची लेखा विभागामार्फत अदायगी न करता ती विभागाकडे परत पाठविण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(जितेंद्र कोळंबे)
मुख्य लेखा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**प्रति,**
सर्व विभागप्रमुख